# रेग्युलर दिवाणी मुकदमा नं. ११६/२०११ मधील निशाणी ३९ वरील आदेश

( रेखा रायगोंडा पाटील वि. द–याप्पा महादेव बाळुमाने वगैरे)

*****

१. प्रतिवादी नं.१ ते ३ व ६ यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश–६, नियम–१७ प्रमाणे कैफियत दुरुस्तीसाठी केला आहे.

२. प्रतिवादींचे असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द दावामिळकतीचे सरसनिरसमानाने तुटक वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी निशाणी १७ येथे कैफियत दाखल केली. प्रतिवादी नं.१ हे अनुक्रमे प्रतिवादी नं.२ यांचा मुलगा व प्रतिवादी नं.३ यांचा भाऊ आहे. प्रतिवादी नं.२ व ३ यांनी प्रतिवादी नं.१ वरील प्रेम व जिव्हाळयापोटी दावामिळकतीतील आपल्या समाईकातील अविभक्त हक्क हिश्याचे विनामोबदला हक्क सोडपत्र प्रतिवादी नं.१ यांचे लाभात करुन दिले आहे. सदरची वस्तुस्थिती प्रस्तुतचा दावा न्यायप्रविष्ठ असतांना घडलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी अर्ज कलम १अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कैफियत निशाणी १७ मधील कलम ८ नंतर ८अ हा मजकूर समाविष्ट करण्याची परवानगी मागितली आहे.

३. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, उपरोक्त कारणांमुळे सदरची कैफियतीमधील दुरुस्ती ही अंत्यत महत्वाची आहे. वाद विषयाच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांचेमधील सर्व वाद दावेकामी संपुष्टात येणे आवश्यक असलेने पुन्हा दावे

करावे लागू नयेत म्हणून प्रतिवादींनी कैफियतीमध्ये दुरुस्ती मागितली आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे प्रतिवादींच्या बचावामध्ये कोणताही फेरबदल होत नाही. प्रस्तुत दुरुस्तीमुळे वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट सदरचा अर्ज नामंजूर झालेस प्रतिवादींचे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादींनी कैफियतीमध्ये सदरची दुरुस्ती करण्याची परवानगी मिळण्याची विनंती केली आहे.

४. वादीने सदर अर्जास म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज मान्य व कबूल नसल्याचे कथन केले आहे. वादी असे कथन करतात की, प्रतिवादी नं.१ ने प्रतिवादी नं.२ व ३ यांचेकडून करुन घेतलेले हक्कसोडपत्र हे सदरचा दावा प्रलबिंत असतांना केले आहे. प्रतिवादी नं.१ हे वादीचा आपल्या वडीलार्जीत मिळकतीतील वादींचा हिस्सा डावलण्याच्या हेतूने सदर अर्ज केला आहे. दाव्याचा निर्णय लांबविण्याकरीता प्रतिवादीने सदरचा दुरुस्ती अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादींचा कैफियत दुरुस्तीचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

५. प्रतिवादींचा अर्ज, त्यावरील वादीचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादी व प्रतिवादीतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

६. वादी व प्रतिवादी यांचे परस्पर विरोशी कथनांवरुन खालील मुद्दे विचारार्थ आले आहेत. सदरचे मुद्दे आणि त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहीत खालीलप्रमाणे आहेत.

| अ.नं. | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजूर होणेस पात्र आहे काय | होकारार्थी |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ व २ बाबत**–

७. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करता प्रतिवादी नं.१ हे अनुक्रमे प्रतिवादी नं.२ यांचा मुलगा व प्रतिवादी नं.३ यांचा भाऊ आहेत. प्रतिवादी नं.२ व ३ यांनी प्रतिवादी नं.१ करीता दावामिळकतीतील आपल्या समाईकातील अविभक्त हक्क हिश्याचे विनामोबदला हक्क सोडपत्र प्रतिवादी नं.१ यांचे लाभात करुन दिले आहे. सदरची वस्तुस्थिती प्रस्तुतचा दावा न्यायप्रविष्ठ असतांना घडलेली आहे. प्रतिवादी यांनी अर्ज कलम १अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे कैफियत निशाणी १७ मधील कलम ८ नंतर ८अ हा मजकूर समाविष्ट करण्याची परवानगी मागितली आहे. दावामिळकती या वादी प्रतिवादी यांच्यामध्ये समाईक अशाच असून त्यामध्ये वाटप झालेले नाही असे कथन केले असल्यामुळे प्रतिवादींना कैफियत दुरुस्त करणे गरजेचे वाटते. तसेच प्रतिवादींनी मागितलेली दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे व त्यामुळे प्रतिवादींच्या बचावात काही बदल होणार नाही. सदरचा अर्ज नामंजूर केलेस प्रतिवादींचे नूकसान होणार नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायाला अनुसरुन व दोन्ही पक्षकारांचे हित लक्षात घेवून सदरची कैफियत दुरुस्ती मंजूर होणे न्यायोचित होणार आहे. त्यामुळे दोन्ही पक्षकारांमधील असलेला वाद संपुष्टात आणणेसाठी व न्यायदानासाठी मदत होईल. तसेच यामुळे दाव्यांची संख्या मर्यादित राहून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान असणारे मुद्दे एकत्रात निकाली करणे सोपे होईल. सबब वरील विवेचनावरुन मी खालील प्रमाणे

आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादीने कैफियतीमध्ये विहीत कालावधीत योग्य ती नियोजीत दुरुस्ती करावी.

३. प्रतिवादीने दुरुस्त कैफियतची प्रत न्यायालयासाठी व वादीसाठी दयावी.

सही/-

ठिकाण –मिरज. (निलेश एम.वाली )

दिनांक –१२.१२.२०१८. सहदिवाणी न्यायाधीश, क.स्तर, मिरज.

*****